# प्रेसनोट दिनांक ०१/०२/२०१८

**सराईत गुंड नामे- राहुल शाम भरगुडे,वय- २१ वर्ष, रा. ९७२ शुक्रवारपेठ,साठे कॉलनी पुणे,यास पुणे शहर व पुणे जिल्हयातुन एक वर्षासाठी तडीपार**

मा.रश्मी शुक्ला,पोलीस आयुक्त पुणे शहर व मा.रविंद्र कदम,पोलीस सह आयुक्त,पुणे शहर यांनी आगामी काळात पुणे शहरात मोठया प्रमाणात साजरे होणारे सण व उत्सवाचे काळात कोणताही अनुचीत प्रकार घडु नये व व आपले गुन्हेगारी वर्चस्व निर्माण करणारे टोळीचा/गुन्हेगारांचा समुळ नायनाट करण्यासाठी व त्यांचेविरुध्द कडक व ठोस कारवाई करण्याबाबत पोलीस अधिकारी यांना आदेश दिलेले आहेत.

खडक पोलीस स्टेशन पुणे चा गुन्हे अभिलेखावरील सराईत व अटट्ल गुन्हेगार **राहुल शाम भरगुडे,वय- २१ वर्ष, रा. ९७२ शुक्रवारपेठ,साठे कॉलनी पुणे**.याचेविरुध्द **लष्कर पोलीस स्टेशन येथे खुनाचा कट रचणे प्रमाणे १, खडक व स्वारगेट पोलीस स्टेशन येथे दुखापतीचा, घरात घुसुन मारहाण करणे ,व हत्यार जवळ बाळगलेचा, असे एकुण ०३ गुन्हे दाखल आहेत**.तसेच त्याचेविरुध्द सन २०१६ मध्ये त्याने कोणत्याही प्रकारे शांतताभंग होईल असे कृत्य करु नये म्हणुन प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली होती.परंतु त्याचे गुन्हेगारी वागण्यामध्ये काहीही फरक पडलेला नव्हता.

नमुद गुंड नामे- **राहुल शाम भरगुडे,वय- २१ वर्ष, रा. ९७२ शुक्रवारपेठ,साठे कॉलनी पुणे** याचेविरुध्द वेळोवेळी कारवाई करुनही त्याचे वागणुकीत काहीएक फरक पडलेला नव्हता.तो अत्यंत क्रुर,खुनशी व भांडखोर असुन तो लोकांमध्ये काहीना काही कुरापती काढुन मारहाण करुन गंभीर स्वरुपाचे गुन्हे करीत आहे.सर्वसामान्य,शांतताप्रिय नागरीकांना विनाकारण त्रास देवुन आपला गुन्हेगारी हेतु साध्य करीत आहे.त्याने या भागात आपली भयंकर दहशत निर्माण केली होती,त्याचे दहशतीमुळे व भितीपोटी त्याचेविरुध्द तक्रार देण्यास कोणीही पुढे येत नव्हते.त्याचे अशा कृत्यामुळे सर्वसामान्य नागरीकांचे मनात भिती निर्माण होवुन त्यांचे जिवीतास व मालमत्तेस धोका निर्माण झाला होता.म्हणुन त्यास **पुणे शहर आयुक्तालय व पुणे जिल्हयातुन हददपार करण्या बाबतचा प्रस्ताव डॉ.श्री.बसवराज तेली,पोलीस उप आयुक्त,परिमंडळ-१ पुणे शहर यांचेकडे पाठवीण्यात आला होता,त्यानुसार त्यांनी त्यास पुणे शहर व पुणे जिल्हा कार्यक्षेत्रातुन एक वर्षाकरीता तडीपार केलेले आहे.**

अशा प्रकारे आगामी सण व उत्सव काळात कोणताही अनुचीत प्रकार घडु नये या अनुषंगाने पोलीसांकडुन समाजकंटक व अटट्ल गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात आले असुन त्यांचेविरुध्द कठोर कारवाई करण्याचे संकेत पोलीसांनी दिले आहेत.

शहर विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त श्री.किशोर नाईक,यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशन पुणे शहरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.राजेंद्र मोकाशी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.संभाजी शिर्के, पोलीस उप निरीक्षक आनंत व्यवहारे,पोलीस उप निरीक्षक श्री.संजय गायकवाड,पोलीस कर्मचारी, सर्फराज शेख, महेश बारवकर, महेश कांबळे यांनी सदर कारवाई मध्ये भाग घेवुन प्रस्ताव तयार केलेला आहे.